नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अकोला कृषी हवामान सल्ला शुक्रवार दिनांक – ०८.११.२०१९

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०९ ते १३ नोव्हेंबर, २०१९)				
दिनांक	०९/११	१०/११	११/११	१२/११	१३/११
पाऊस (मिमी)	०	०	३	२	०
कमाल तापमान (अं.से.)	३३	३३	३२	३१	३१
किमान तापमान (अं.से.)	२२	२१	२०	२०	१९
ढग स्थिती (आकाश)	अंशतःढगाळ	अंशतःढगाळ	अंशतःढगाळ	अंशतःढगाळ	अंशतःढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८०	७५	७३	७५	७५
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	७०	६५	७०	७०	७५
वा-याचा वेग (किमी / तास)	२	२	१	०	०
वा-याची दिशा	८२	३२	११०	७५	७९

हवामानाचा इशारा	सध्यस्थितीत जिल्यात दिनांक ०८-१२ नोव्हेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
सर्व पिक	पेरणी	सर्व पिकात अतिप्रमाणात पाऊस झालेल्या ठिकाणी शेतातील अतिरिक्त पाणी शेताबाहेर काढून द्यावे. सोयाबीन पिकाचे शेत खाली झाले असल्यास जमिनीत वापसा येताच पूर्व मशागत करून रबी पिकांची (गहू, हरभरा, इत्यादी) पेरणी करावी. रब्बी पिकांच्या पेरणीसाठी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वाणांना प्राधान्य द्यावे
कपाशी	पात्या / बोंड	कपाशीवरील आकस्मिक रोग व्यवस्थापन करिता जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. रोगग्रस्त झाडाच्या भोवतालची जमीन खुरप्याने त्वरित भुसभुशीत करावी झाडाच्या मुळाजवळ कार्बेन्डॅझिम २० ग्रॅम प्रती १० लिटर द्रावणाची आळवणी करावी. कपाशी पिकांमधील फुटलेले बोंडे असेल तर स्थानिक वातावरणाचा अंदाज घेऊन त्वरित कापूस वेचणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. ओला झालेला कापूस योग्य रित्या वाळवून साठवावा . सद्यस्थितीत पिकावर बोंड अवस्थ्येत, बोंड व पात्ये गळ रोखण्यासाठी पिकास २% डीएपी अधिक ४ मी.ली प्लॅनोफीक्स (२०० ग्रम डीएपी + १० लिटर पाणी) १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पिकावर बोंड अवस्थ्येत (लाल्या रोग) पाने लाल पडण्याची लक्षणे दिसताच, मग्नेशीयम सल्फेट २० ते २५ किलो प्रती हेक्टरी झाडाच्या मुळाशी देणे किवां ५० ते १०० ग्रॅम मग्नेशीयम सल्फेट अधिक १०० ग्रॅम युरिया प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
सोयबीन	कापणी	काढलेल्या सोयाबीन पिकाची पावसापासून संरक्षण करावे व तयार झालेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. पिक काढणी राहिले असल्यास अगोदर आपल्या स्थानिक वातावरण व पावसाचा अंदाज घावा.

तूर	वाढ	अति पावसामुळे झालेला करपा किंवा मुळकुंज रोग व्यवस्थापन करिता तूर पिकातील अतिरिक्त पाणी शेताबाहेर काढून द्यावेरोगग्रस्त झाडाच्या भोवतालची जमीन खुरप्याने त्वरित भुसभुशीत करावी ., झाडाच्या मुळाजवळ कॉपोर ऑसीक्लोरीड २५ ग्रॅम प्रती १० लिटर द्रावणाची आळवणी करावी.
रब्बी पिके	पेरणी	बागायती हरभऱ्याची (जाकी ९२१८, पीडीकेव्ही कांचन) पेरणी नोव्हेंबर १५ पर्यंत केल्यास हरकत नाही. हरभरा पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबियम व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. वेळेवर गव्हाची पेरणी करण्याकरिता योग्य वाणाची निवड करून (विमल, पूर्णा, एचडी २३८०, एचडी २१८९) १ ते २० नोव्हेंबर दरम्यान बीज प्रक्रिया करून पेरणी करावी.
फळझाडे	वाढ	मृग बहारातील फळ झाडांना अति पावसामुळे झालेला करपा किंवा मुळकुंज रोग व्यवस्थापन करिता जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मृग बहारातील फळांची वाढ वेगाने होण्याकरिता जिब्रेलिक ॲसिड १५ पीपीएम + मोनो-पोटॅशियम फॉस्फेट १%(१किलो) १०० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी.
भाजीपाला	लागवड	मिरची पिकावरील शेंडेमर (डाय-बेक) व फळसड रोगाच्या नियत्रंणाकरिता डायफेनकॉनाझोल २५ ईसी ५ मिली १० लिटर पाण्यात किवां अझोक्सोस्त्रोबीन २३% एस सी १० मिली किवां बेनोमिल ५० % डब्लूपी ४ ग्राम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. लवकर व उशिरा येणारा करपा रोगाच्या नियत्रंणाकरिता अझोक्सोस्त्रोबीन २३% एससी, १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
पशु व पक्षी		तापमानात घट होत असल्यामुळे शेळयांच्या तसेच कोंबड्यांच्या शेडला बारदाण्याचे परदे लावावे यामुळे पहाटेच्या थंडी वा-यापासून त्यांचे संरक्षण होईल, तसेच शेडमध्ये रात्रीच्या वेळी विधूत बल्ब लावून शेडमध्ये तापमान ३० अं.सें पर्यंत नियंत्रित करावे. जनावरांसाठी लिव्हर फ्ल्यू रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना जंताचे औषध द्यावे. चपटी कृमी रोग प्रतिबंधक उपाय म्हणून सर्व जनावरांना पशुवैद्यकीय सल्ल्याने जंताचे औषध द्यावे.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.